लोकमत

**प्रशांत गायकवाड :** शिवाजी विद्यापीठातील कारेकर व्याख्यानमाला; 'पंचगंगा प्रदूषण-सद्य:स्थिती'वर गुंफले पुष्प

# वैयक्तिक पातळीवर पाणी वापर कमी व्हावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील नद्यांच्या प्रदूषण पातळीनुसारच्या मापनामध्ये पंचगंगा नदीला उत्कृष्ट मानांकन मिळाले. त्याचे कारण या परिसराला लाभलेल्या धरणातून नदीत पाणी सोडल्यामुळे प्रदूषण सौम्य होते. वैयक्तिक पातळीवर पाण्याचा वापरच कमी केला, तरच नदीचे प्रदूषण कमी होण्यास हातभार लागेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे शनिवारी (दि. १६) आयोजित केलेल्या प्रा. नरहर विष्णू कारेकर या विज्ञानविषयक व्याख्यानमालेत ते बोलत होते. त्यांचा विषय 'पंचगंगा प्रदूषण-सद्य:स्थिती' असा होता. अध्यक्षस्थानी पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. पी. डी. राऊत होते. गायकवाड म्हणाले, पंचगंगा नदी ही वरदायिनी आहे. आपल्या भागातील आर्थिक, सामाजिक विकासासाठी ही नदी स्वच्छ ठेवणे हा एकच पर्याय आहे. नदीच्या प्रदूषणास नागरी वसतिस्थानांकडून विशेषत: कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी नगरपालिका काठावर वसलेली ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ११ गावे कारणीभूत आहेत. औद्योगिक वसाहती ही तितक्याच जबाबदार आहेत. या नदीवर ६४ बंधारे बांधून पाणी अडविले आहे. त्यामुळे नदी वाहती राहत नाही. प्रदूषणाची पातळी कमी करण्याकरिता कोल्हापूर महापालिकेकडे असणारी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा योग्यरितीने कार्यरत नाही. इचलकरंजीमधील कापड उद्योगांतून मोठ्या प्रमाणात सांडपाणी बाहेर पडते. या परिसरातील कारखान्यांनादेखील पाण्याचा वापर, प्रदूषण कमी करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी सक्त ताकीद दिली जाते. या कार्यक्रमात डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक, पल्लवी भोसले यांनी आभार मानले.




शिवाजी विद्यापीठात शनिवारी पर्यावरणशास्त्र विभागातर्फे आयोजित व्याख्यानमालेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. शेजारी पल्लवी भोसले, पी. डी. राऊत, आसावरी जाधव उपस्थित होत्या.

## व्यक्तिश: प्रयत्नांना जास्त महत्त्व

**डॉ. राऊत म्हणाले, पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी शासन किंवा अशासकीय संस्था आपली भूमिका पार पाडत असल्या तरीही व्यक्तिश: प्रयत्नांना जास्त महत्त्व आहे. पाण्याचा वापरच कमी झाला, तर सांडपाणी प्रक्रिया केंद्रांवरील ताणदेखील कमी होईल. नदी प्रदूषित होणार नाही.**

लोकमत

# उच्च शिक्षणातून सामाजिक बांधीलकीची जाणीव निर्माण व्हावी

## पी. एस. पाटील : विवेकानंद महाविद्यालयात 'नॅक'वर चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : नॅक नवीन सात विभागांतून विद्यार्थ्यांचा विकास, शिक्षकांची गुणवत्ता, प्रशासनाची भूमिका आणि सामाजिक बांधीलकी या चार बाबी महत्त्वाच्या आहेत. उच्च शिक्षणाच्या प्रत्येक शाखेच्या अभ्यासक्रमात अशा बाबींचा समावेश झाला पाहिजे. ज्यातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास, नोकरीच्या संधी प्राप्त होतील. उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीची जाणीव निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी येथे केले.

येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता विकास' असा या चर्चासत्राचा विषय होता. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे होत्या. डॉ. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांची कौशल्ये ओळखून त्याला योग्य दिशा देण्याचे कसब शिक्षकांकडे असले पाहिजे. प्राचार्या गावडे म्हणाल्या, नॅकच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक संस्थेला आपला दर्जा राखता आला पाहिजे. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असला पाहिजे. कार्यक्रमात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत केले. प्रा. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले.

चर्चासत्रातील दुसऱ्या सत्रामध्ये फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथील डॉ. समीर तेरदाळकर, एम. यु. कॉलेज पुणे येथील माजी प्राचार्य डॉ. शिरीष चिंधडे यांनी नवशिक्षणातील बदलते तंत्रज्ञान यावर मौलिक विचार मांडले.

Hello Kolhapur
Page No. 7 Mar 19, 2019
Powered by: erelego.com

# नेट-सेटच्या माध्यमातून करिअर करण्याचा प्रयत्न करा

## - गजानन राशिनकर

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :**
विद्यार्थ्यांनी नेट-सेटच्या माध्यमातून करिअर करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. या परीक्षेकडे संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. या क्षेत्रातून करिअर करण्याचा ध्यास विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे केमिस्ट्री विभागाचे प्रा. डॉ. गजानन राशिनकर यांनी केले. येथील शिवराज महाविद्यालयात पदव्युत्तर विभाग व स्पर्धा परीक्षा विभाग आयोजित 'नेट-सेट परीक्षेचे बदलते स्वरूप' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे होते.

प्रा. सुधीर मुंज यांनी स्वागत केले. यावेळी प्रा. डॉ. गजानन राशिनकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी नेट-सेट परीक्षा अवघड आहे हे न्यूनगंड आपल्या मनातून काढणे गरजेचे आहे. नेट-सेटचा अभ्यास गांभीर्याने करणे महत्त्वाचे आहे. नेहमी सकारात्मक विचार करुन मनापासून अभ्यास करणे आवश्यक आहे तरच या परीक्षेत यशस्वी व्हाल, असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सध्या या परीक्षेचे स्वरुप बदललेले आहे. ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. या परीक्षेसाठी आपल्या अभ्यासाची दिशा निश्चित करा त्यासाठी मेहनत घ्या सातत्यपूर्ण अभ्यास करा. अधिकाधिक प्रश्नपत्रिका सोडविण्याचा प्रयत्न करा. शिवाय यासाठी क्लृप्त्या माहित असणे आवश्यक आहे तरच आपण नेट-सेट परीक्षेत खऱ्याअर्थी यशस्वी होऊ शकतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन करून अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक असल्याचे डॉ. राशिनकर यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासून ध्येय निश्चित करून त्या दृष्टीने वाटचाल ठेवल्यास नक्कीच यश मिळेल. पण, यश मिळेपर्यंत आणि आपले ध्येय साध्य होईपर्यत प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, संचालक ॲड. दिग्विजय कुराडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




**गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना गजानन राशिनकर. उपस्थित दिग्विजय कुराडे, महेश चौगुले यांच्यासह मान्यवर.**

दुसऱ्या सत्रात विविध विषयाबाबत प्रा. विश्वनाथ तराळ, प्रा. संजीवनी पाटील, प्रा. ए. के. मोरमारे, डॉ. संदीप परीट, प्रा. डी. के. कमलाकर, प्रा. बी. एम. जाधव, प्रा. गोयल यांनी विविध विषयांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी स्पर्धा परीक्षा प्रमुख प्रा. एन. बी. ईकीले, दूर शिक्षण विभाग समन्वयक डॉ. महेश चौगुले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. जी. गायकवाड, पदव्युत्तर विभागाचे दिगंबर देसाई यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. बी. डी. अजळकर यांनी आभार मानले.